दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०४ • अंक : ०२२ • पुणे • गुरुवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

# महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची 'तुपात बोटे' लाल

**कारागृहातील बंद्यांच्या आरोग्याचे हाल** • **नागपूर चाळ ते ५०९ चौक मार्गावर अवैध पथारीवाल्यांचे अतिक्रमण** • **सडलेला भाजीपाला, फळांचा कचरा थेट कारागृह परिसरात** • **व्हीआयपी-व्हीव्हीआयपींच्या वर्दळीच्या मार्गाची दुर्दशा** • **कारागृह प्रशासनाच्या तक्रारींकडेही दुर्लक्ष?**

**पुणे शहरातील नागपूर चाळ ते ५०९ चौक हा महत्त्वाचा मार्ग असून, विमानतळाकडून शहरात येणाऱ्या वाहनांसाठी हा प्रमुख मार्ग मानला जातो. या मार्गावरून विविध कार्यक्रमांसाठी पुण्यात येणाऱ्या अनेक मान्यवरांची वाहने तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते. मात्र, या महत्त्वाच्या मार्गाच्या कारागृह परिसरालगतच्या भागात अवैध पथारी, फळविक्री, भाजीविक्री, हातगाड्या आणि ठेले मोठ्या प्रमाणावर उभे राहत असल्याने परिसराच्या स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे.**





**पुणे - प्रतिक गंगणे**
**(दै. आरंभ पर्व)**

विशेष म्हणजे, अवैध विक्रेत्यांकडून दररोज उरलेला आणि खराब झालेला भाजीपाला, फळे तसेच इतर कुजणारे पदार्थ कारागृहाच्या परिसरालगत टाकून दिले जात असल्याचा आरोप आहे. त्यामुळे या भागात दुर्गंधी पसरत असून, नागरिकांसह कारागृह अधिकारी, कर्मचारी आणि कारागृह परिसरात राहणाऱ्या कुटुंबीयांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले जात आहे.

**साडेसहा हजारांहून अधिक बंदी असलेल्या कारागृहालगतच कचऱ्याचा ढिगारा**

या परिसरात कारागृह अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवासस्थाने आहेत. तसेच कारागृहामध्ये साडेसहा हजारांहून अधिक बंदी असल्याचे सांगितले जाते. एवढ्या मोठ्या संख्येने बंदी असलेल्या संवेदनशील परिसराच्या बाहेरील भागातच सडलेला भाजीपाला आणि फळांचा कचरा साचत असेल, तर स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने हा गंभीर प्रश्न आहे.

सडलेल्या अन्नपदार्थांमुळे दुर्गंधी निर्माण होण्याबरोबरच माशा, डास, उंदीर आणि इतर कीटकांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे परिसरातील सार्वजनिक आरोग्य धोक्यात येऊ शकते. विशेषतः कारागृहासारख्या संवेदनशील ठिकाणी स्वच्छतेकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक असताना या परिस्थितीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे.

**महापालिकेचे पथक करते तरी काय?**

नागपूर चाळ ते ५०९ चौक या मार्गावर पथारीवाले, फळविक्रेते आणि भाजीविक्रेते नियमितपणे बसत असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जाते. हातगाड्या व ठेले रस्त्याच्या कडेला लावल्यामुळे वाहतुकीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. मात्र, संबंधित महापालिका विभागाकडून या अनधिकृत विक्रेत्यांवर सातत्यपूर्ण कारवाई का होत नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

एक-दोन वेळा कारवाई करून पुन्हा त्याच ठिकाणी पथारीवाले बसत असतील, तर अशा कारवाईचा नेमका उपयोग काय, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. अतिक्रमण हटविणे, जप्ती करणे आणि पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण होऊ नये यासाठी नियमित देखरेख ठेवणे ही संबंधित यंत्रणेची जबाबदारी आहे.

**'कारवाई होत नाही' यामागे नेमके कारण काय?**

स्थानिक पातळीवर संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे आरोप केले जात आहेत. काही विक्रेत्यांचे स्थानिक पातळीवरील राजकीय किंवा इतर प्रभावशाली व्यक्तींशी संबंध असल्यामुळे कारवाई होत नसल्याची चर्चा असल्याचेही सांगितले जाते. मात्र, या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही.

त्यामुळे महापालिका प्रशासनाने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी या भागात यापूर्वी किती वेळा कारवाई केली, किती अतिक्रमणे हटविली, किती साहित्य जप्त केले आणि त्यानंतर पुन्हा अतिक्रमण झाले का, याची माहिती सार्वजनिक करणे आवश्यक आहे.

**कारागृह प्रशासनाच्या तक्रारींकडेही दुर्लक्ष?**

या समस्येबाबत कारागृह प्रशासनाकडून महापालिकेकडे अनेक वेळा तक्रारी व पाठपुरावा करण्यात आल्याचे समजते. जर हे खरे असेल, तर संबंधित तक्रारींवर महापालिकेने कोणती कार्यवाही केली, याचे उत्तर प्रशासनाने देणे गरजेचे आहे.

कारागृह प्रशासनासारख्या शासकीय यंत्रणेकडून एखाद्या परिसरातील स्वच्छता, अतिक्रमण किंवा आरोग्यविषयक समस्या वारंवार निदर्शनास आणून दिल्यानंतरही त्या समस्येवर ठोस उपाययोजना होत नसतील, तर हा केवळ अतिक्रमणाचा प्रश्न राहत नाही; तो प्रशासकीय जबाबदारीचा प्रश्न बनतो.

**व्हीआयपी मार्गाची अवस्था अशी का?**

विमानतळाकडून पुणे शहरात प्रवेश करणाऱ्या या मार्गावरून अनेक महत्त्वाच्या व्यक्तींची वाहने ये-जा करतात. शहराची ओळख निर्माण करणाऱ्या प्रमुख मार्गांपैकी एक असलेल्या या रस्त्याच्या कडेला जर सडलेल्या भाजीपाल्याचा आणि फळांचा कचरा साचत असेल, तर पुण्याच्या स्वच्छतेच्या दाव्यांवरही प्रश्नचिन्ह निर्माण होते. मान्यवरांची वाहने गेली की रस्ता स्वच्छ आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी मात्र कचऱ्याचा सामना, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. स्वच्छता आणि अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई ही व्यक्ती किंवा वाहन पाहून नव्हे, तर नियमांनुसार समान पद्धतीने झाली पाहिजे. महापालिका प्रशासनाने आता केवळ दिखाऊ कारवाई न करता नागपूर चाळ ते ५०९ चौक या संपूर्ण मार्गाचे सर्वेक्षण करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. कारागृह प्रशासनाच्या तक्रारींवर नेमकी कोणती कारवाई झाली, याचा तपशीलही प्रशासनाने जाहीर करणे गरजेचे आहे. कारागृहातील बंदी असोत, अधिकारी-कर्मचारी असोत किंवा या मार्गावरून प्रवास करणारे नागरिक सर्वांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नाकडे आता तरी महापालिका प्रशासनाने गांभीर्याने पाहणार का? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

## महापालिकेने तातडीने कराव्यात या उपाययोजना

या संपूर्ण परिसराची पाहणी करून अनधिकृत पथारी व हातगाड्यांवर नियमानुसार कारवाई करणे, सडलेला भाजीपाला व फळांचा कचरा तातडीने हटविणे, परिसराचे नियमित निर्जंतुकीकरण करणे आणि कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच कारागृह परिसराच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही या भागातील अनधिकृत विक्री व गर्दीबाबत संबंधित विभागांनी कारागृह प्रशासनाशी समन्वय साधणे गरजेचे आहे.

## 'तुपात बोटे' नेमकी कोणाची?

या संपूर्ण प्रकरणात सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे—अनधिकृत पथारीवाल्यांवर कारवाई न होण्यामागे नेमके कारण काय? महापालिकेचे अधिकारी नियमांनुसार कारवाई करत असतील तर त्याची नोंद उपलब्ध असली पाहिजे. कारवाई होत नसेल तर त्यामागचे कारण स्पष्ट झाले पाहिजे. आणि जर कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव, स्थानिक हस्तक्षेप किंवा आर्थिक हितसंबंध असल्याचा आरोप होत असेल, तर त्याचीही चौकशी झाली पाहिजे. कारण प्रश्न केवळ रस्त्याच्या सौंदर्याचा नाही. एका बाजूला महत्त्वाचा वाहतूक मार्ग, दुसऱ्या बाजूला कारागृह, त्यात हजारो बंदी आणि परिसरात राहणारे अधिकारी-कर्मचारी—अशा संवेदनशील ठिकाणी सडलेल्या अन्नकचऱ्याची समस्या निर्माण होणे ही गंभीर बाब आहे.

## ठळक बातम्या

### खाद्यसंस्कृतीचा अनोखा ठेवा कोशबद्ध

पुणे (आरंभ पर्व) : 'महाराष्ट्र खाद्य संस्कृती कोश' या अनोख्या आणि खाद्य संस्कृती जपणाऱ्या कोशाच्या "महाराष्ट्राची परंपरा: सण, उत्सव आणि खाद्यसंस्कृती" या पहिल्या खंडाच्या दोन भागांचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत नुकतेच करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मान्यतेने आणि टि.म.वि च्या माध्यमातून या कोशनिर्मितीचे कार्य चालू आहे. महामहोपाध्याय प्रा. (डॉ.) अभिजीत जोशी या कोशाचे मुख्य संपादक आणि प्रधान संशोधक म्हणून कार्यरत आहेत.

### ४२ टक्के क्षेत्रावर अपुरे पर्जन्य

पुणे (आरंभ पर्व) : यंदाच्या जून ते सप्टेंबर या नैऋत्य मॉन्सून हंगामात देशभरात दीर्घकालीन सरासरीच्या ८७ टक्के; तर राज्यात ८१ टक्के पाऊस झाल्याची माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने बुधवारी जाहीर केली. यावर्षीच्या मॉन्सूनवर एल निनोचा प्रभाव स्पष्टपणे दिसून आल्याचे नमूद करतानाच मॉन्सूनोत्तर हंगामात देशाच्या बहुतांश भागांत सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यताही 'आयएमडी'ने वर्तविली आहे. त्यामुळे खरिपासोबतच रब्बीच्या पिकांबाबतही चिंता वाढली आहे. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. टी. श्रीनिवास कुमार आणि 'आयएमडी'चे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी जून ते सप्टेंबर या नैऋत्य मॉन्सून हंगामाचा अहवाल आणि आगामी ईशान्य मॉन्सून हंगामाचा अंदाज ऑनलाईन स्वरूपात बुधवारी जाहीर केला.

## पुण्यावर पाणीकपातीची टांगती तलवार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यातील दुष्काळ परिस्थिती विचारात घेऊन धरणांतील सध्याचा पाणीसाठा पुढील वर्षी ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरेल, अशा पद्धतीने नियोजन करण्याच्या सूचना राज्य शासनाने जलसंपदा विभागाला दिल्या आहेत. त्यासाठी राज्यातील सर्व शहरांसह ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचे स्रोत टिकविण्यासाठी टप्प्याटप्प्याने १० टक्के पाणी कपात करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरांतील पाणीपुरवठ्यात भविष्यात कपात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अपुरा पाऊस, धरणात कमी असलेला पाणीसाठा आणि राज्यात जाहीर केलेला दुष्काळ या सर्व पार्श्वभूमीवर उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्याचे काम सरकारने गांभीर्याने घेतले आहे. या संदर्भात मंत्रिमंडळ उपसमितीची मुंबईत बैठक झाली. त्यात जलसंपदा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना याबाबतच्या सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

## आर्थिक व्यवहारांबाबत मनोज जरांगेंच्या सहकाऱ्यांच्या अडचणीत वाढ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे डिफेंडर गाडीतून प्रवास करत असल्यामुळे वाद निर्माण झाला. त्यानंतर ती गाडी मनोज जरांगे यांच्या मित्राची असल्याची समोर आली आणि त्यांनी ती गाडी मित्राला परत केली. आता मनोज जरांगे यांच्याशी संबंधित काही व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांबाबत ईडी उच्चस्तरीय गोपनीय चौकशी सुरू केली आहे. आर्थिक अनियमिततेच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ईडीने संबंधित तक्रारदारांचे जबाब नोंदवून पुरावे आणि कागदपत्रे मागवली आहेत. तसेच आयकर विभागासह अन्य सरकारी यंत्रणांकडूनही संबंधित तक्रारी आणि आर्थिक नोंदींची माहिती मागविण्यात आली आहे. बीडमधील कार्यकर्ते अमोल सुखदेव खुणे यांनी दिलेल्या तक्रारीत मनोज जरांगे तसेच अन्य चार व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. या तक्रारीत बेहिशेबी मालमत्ता, संशयित बेनामी मालमत्ता, सरकारी कंत्राटे आणि विविध आर्थिक व्यवहारांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. तसेच मराठा आरक्षण आंदोलनावरील खर्च, जमीन खरेदी-विक्री, वाळू व्यवसाय आणि विविध सरकारी विभागांकडून मिळालेल्या कंत्राटांचाही उल्लेख करण्यात आला आहे. तक्रारदाराने संबंधित आर्थिक व्यवहारांची रक्कम सुमारे १०० ते २०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक असल्याचा दावा केला आहे.

मात्र हा आकडा अद्याप स्वतंत्रपणे सिद्ध झालेला नाही. सध्या ईडीची चौकशी टी-१ गुप्तचर स्तरावर सुरू असून अद्याप ईसीआयआर दाखल करण्यात आलेले नाही किंवा मनी लाँड्रिंगचा औपचारिक गुन्हाही नोंदवण्यात आलेला नाही.

# खानापूर गावाला कचऱ्याचा विळखा

### रस्ते, गल्ल्या अन् ओढे-नाले झाले कचरा डेपो



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड परिसरातील खानापूर गावात कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, संपूर्ण गावाला कचऱ्याचा विळखा पडला आहे. मुख्य रस्ते, अंतर्गत गल्ल्या, ओढे-नाले तसेच सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याने अनेक ठिकाणांना अक्षरशः कचरा डेपोचे स्वरूप आले आहे. सडलेल्या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, डास-माशांचा प्रादुर्भाव वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पावसाचे पाणी आणि सांडपाण्याच्या संपर्कात आल्याने कचरा कुजत आहे. त्यातून दुर्गंधीबरोबरच डास, माशा आणि इतर कीटकांची पैदास वाढत आहे. त्यामुळे साथीचे आजार पसरण्याची भीती ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे. त्यातच काही नागरिकांकडून सार्वजनिक ठिकाणी सडलेला कचरा, अन्नपदार्थ, मांस तसेच मृत कोंबड्या आणि जनावरे टाकली जात असल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे.

खानापूर गावाची लोकसंख्या सुमारे सात हजार आहे. पश्चिम हवेलीतील सिंहगड-पानशेत भागाचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने गावात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. पुणे-पानशेत रस्त्यालगत व्यापारी केंद्र विकसित झाले असून, राष्ट्रीयीकृत व सहकारी बँका, पतसंस्था, वीज कार्यालय, मंडल महसूल कार्यालय, परिमंडळ वन कार्यालय आणि आरोग्य केंद्र यांसारखी महत्त्वाची कार्यालये व संस्था गावात आहेत.

गावात दररोज सुमारे एक टन कचरा निर्माण होतो. त्यामध्ये प्लास्टिकच्या कचऱ्याचे प्रमाण मोठे आहे. मात्र, कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी ग्रामपंचायतीकडे आवश्यक जमीन उपलब्ध नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीकडून गोळा करण्यात येणारा कचरा यापूर्वी महापालिकेच्या कचरा डेपोत नेऊन टाकला जात होता. मात्र, महापालिकेने खानापूरचा कचरा स्वीकारणे बंद केल्यापासून ग्रामपंचायतीसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने गावातच कचरा साचत आहे. परिणामी रस्ते, गल्ल्या आणि ओढे-नाले अस्वच्छतेच्या विळख्यात सापडले आहेत.

खानापूरच्या सरपंच शिल्पा गायकवाड यांनी सांगितले की, गावातील कचरा संकलनासाठी ग्रामपंचायतीने दोन कचरा गाड्या घेतल्या आहेत. गावात कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी जागा नसल्याने दररोज गोळा होणारा कचरा महापालिकेच्या कचरा डेपोत दिला जात होता. मात्र, महापालिकेने कचरा स्वीकारणे बंद केल्यामुळे कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या समस्येवर तातडीने तोडगा काढण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.

कचऱ्याबरोबरच मैलापाणी आणि सांडपाण्याची समस्याही गंभीर आहे. या प्रश्नांबाबत विधिमंडळात वेळोवेळी आवाज उठविण्यात आला असतानाही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे.

कचऱ्यामुळे दुर्गंधी वाढली असून डास आणि माशांचा प्रादुर्भावही वाढला आहे. त्यामुळे नागरिक, विशेषतः लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन दररोज नियमित कचरा संकलन करावे, कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करावे आणि त्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्याची व्यवस्था उभारावी, अशी मागणी जावळकर यांनी केली आहे.

### ओला-सुका कचरा वेगळा करून प्रक्रिया करण्याची मागणी

खडकवासला विधानसभा भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष शरद जावळकर यांनी ग्रामपंचायतीच्या कचरा व्यवस्थापनावर प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीच्या कचरा गाड्या अनेक दिवसांपासून कचरा संकलन करत नसल्याने गावातील विविध भागांत कचऱ्याचे मोठमोठे ढीग साचले आहेत. काही गाड्या वापराअभावी उभ्या असल्याचेही त्यांनी सांगितले.

### विधिमंडळात प्रश्न उपस्थित होऊनही प्रशासनाचे दुर्लक्ष

खानापूर गावाच्या एका बाजूला सिंहगड किल्ल्याच्या डोंगररांगा, तर दुसऱ्या बाजूला खडकवासला धरणाचे पाणलोट क्षेत्र आहे. त्यामुळे कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी गावरान अथवा सरकारी जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रश्नही गंभीर आहे. वाढती लोकसंख्या आणि वाढती वाहतूक यामुळे कचऱ्याचे प्रमाण वाढत असताना त्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्याची व्यवस्था मात्र अद्याप झालेली नाही.

# कचऱ्याच्या ढिगाऱ्यात हरवलेले खानापूर!

संपादकाय
विचार आजचा... दिशा उद्याची...

**गाव सुंदर असावे, स्वच्छ असावे, निरोगी असावे, अशी अपेक्षा प्रत्येक नागरिकाची असते. मात्र, सिंहगडाच्या कुशीत वसलेल्या खानापूर गावाची सध्याची अवस्था पाहिली तर या अपेक्षांना प्रशासनाच्या उदासीनतेने हरताळ फासल्याचे चित्र दिसते. रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे ढीग, गल्ल्यांमध्ये साचलेला कचरा, ओढे-नाल्यांमध्ये टाकले जाणारे घाण पाणी आणि सार्वजनिक ठिकाणी फेकला जाणारा जैविक कचरा, अशी परिस्थिती निर्माण झाली असेल तर हा केवळ अस्वच्छतेचा प्रश्न राहत नाही; तो थेट सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न बनतो.**

खानापूरची लोकसंख्या वाढत आहे. पुणे-पानशेत मार्गावरील महत्त्वाचे ठिकाण असल्याने गावात नागरिकांची आणि वाहनांची वर्दळही मोठी आहे. विविध शासकीय कार्यालये, बँका, पतसंस्था, आरोग्य केंद्र आणि व्यापारी आस्थापनांमुळे गावाचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे येथे निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाणही स्वाभाविकपणे वाढणार आहे. मात्र, लोकसंख्या आणि कचऱ्याचे प्रमाण वाढत असताना त्याच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक यंत्रणा वाढविण्यात आली का, हा खरा प्रश्न आहे. गावात दररोज मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो. ग्रामपंचायतीने कचरा संकलनासाठी वाहने घेतली आहेत, ही सकारात्मक बाब आहे. परंतु कचरा गोळा केल्यानंतर त्याची विल्हेवाट कुठे लावायची, त्याचे वर्गीकरण कसे करायचे आणि त्यावर प्रक्रिया कशी करायची, याचे ठोस नियोजन नसेल तर कचरा संकलनाची प्रक्रिया अर्धवटच राहते. महापालिकेने कचरा स्वीकारणे बंद केल्यानंतर निर्माण झालेली परिस्थिती याचेच उदाहरण आहे. कचरा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविणे म्हणजे कचरा व्यवस्थापन नव्हे. ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, जैविक कचऱ्यावर प्रक्रिया करणे, प्लास्टिकचा पुनर्वापर करणे आणि उर्वरित कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे, ही आधुनिक कचरा व्यवस्थापनाची मूलभूत तत्त्वे आहेत. खानापूरसारख्या गावानेही आता या दिशेने पाऊल टाकण्याची गरज आहे.

मात्र प्रशासनाबरोबरच नागरिकांची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. रस्त्यावर कचरा टाकणे, नाल्यात प्लास्टिक फेकणे, मांसाचे अवशेष किंवा मृत जनावरे सार्वजनिक ठिकाणी टाकणे, ही कृती कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. प्रशासनाने व्यवस्था उभी करावी, पण नागरिकांनीही त्या व्यवस्थेचा जबाबदारीने वापर केला पाहिजे. स्वच्छ गाव ही केवळ ग्रामपंचायतीची जबाबदारी नसून संपूर्ण गावाची सामूहिक जबाबदारी आहे.

खानापूरच्या भौगोलिक परिस्थितीमुळे हा प्रश्न आणखी संवेदनशील आहे. एका बाजूला सिंहगडाच्या डोंगररांगा आणि दुसऱ्या बाजूला खडकवासला धरणाचे पाणलोट क्षेत्र असल्याने कचरा आणि सांडपाणी अनियंत्रितपणे साचणे किंवा वाहून जाणे पर्यावरणाच्या दृष्टीनेही धोकादायक ठरू शकते. आज रस्त्याच्या कडेला पडलेला कचरा उद्या पावसाच्या पाण्यासोबत ओढ्यात, नाल्यात किंवा जलस्रोतांच्या दिशेने जाऊ शकतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ दुर्गंधीपुरता मर्यादित नाही.

या प्रश्नाचे पडसाद विधिमंडळात उमटले असतील, लोकप्रतिनिधींनी मागण्या केल्या असतील, अधिकाऱ्यांकडे निवेदने दिली असतील; तरीही प्रत्यक्ष परिस्थितीत बदल होत नसेल तर या यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. कागदावरील आश्वासने आणि प्रत्यक्षातील कचऱ्याचे ढीग यातील अंतर प्रशासनाने भरून काढले पाहिजे.

खानापूरला कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी जागा उपलब्ध नसल्याचे कारण सांगून समस्या कायम ठेवणे हा कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही. उपलब्ध जागांचा अभ्यास, शेजारील स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय, सामायिक कचरा प्रक्रिया केंद्र, ओला कचरा प्रक्रिया, सुका कचरा संकलन आणि पुनर्वापर यांसारखे पर्याय तातडीने तपासले पाहिजेत.

खानापूरला कचऱ्याचा विळखा पडण्याची वाट पाहत बसणे म्हणजे आजाराला निमंत्रण देणे होय. प्रशासनाने तातडीने कृती आराखडा तयार करून वेळबद्ध पद्धतीने त्याची अंमलबजावणी करावी. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, संबंधित शासकीय विभाग आणि नागरिक यांनी एकत्रितपणे काम केल्यास हा प्रश्न नक्कीच सुटू शकतो.

सिंहगडाच्या पायथ्याशी वसलेले खानापूर कचऱ्याच्या ढिगाऱ्यांसाठी नव्हे, तर स्वच्छता, निसर्ग आणि सुंदर ग्रामीण जीवनासाठी ओळखले जावे. कचरा हटविण्याची वेळ आता आली आहे; अन्यथा उद्या कचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या संकटाला हटविणे अधिक कठीण होईल.

# पद्मश्री डॉ. कोल्हे दाम्पत्याकडून दुधभाते नेत्रालयाच्या आधुनिक नेत्रसेवेचे कौतुक



## डॉ. कोल्हे दाम्पत्याची दुधभाते नेत्रालयाला सदिच्छा भेट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे आणि पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांनी डॉ. दुधभाते नेत्रालय व रेटिना सेंटरला सदिच्छा भेट देत नेत्रालयातील अत्याधुनिक तपासणी व उपचार सुविधांची माहिती घेतली. ग्रामीण व गरजू नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यासाठी गेल्या पाच वर्षांपासून राबविण्यात येणाऱ्या 'फिरता नेत्र दवाखाना' (मोबाईल आय क्लिनिक) उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले.

या भेटीदरम्यान डॉ. रवींद्र कोल्हे आणि डॉ. स्मिता कोल्हे यांची आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने सविस्तर नेत्रतपासणी करण्यात आली. तपासणीसाठी वापरले जाणारे अद्ययावत तंत्रज्ञान, उपचारपद्धती तसेच रुग्णांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची त्यांनी माहिती घेतली. नेत्रालयातील विविध विभाग, वैद्यकीय उपकरणे, स्वच्छता व्यवस्था आणि रुग्णसेवेची कार्यपद्धतीचीही त्यांनी पाहणी केली. नेत्रालयाचे संचालक व प्रख्यात नेत्रतज्ज्ञ डॉ. अनिल दुधभाते यांनी कोल्हे दाम्पत्याचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच डोळ्यांचे आरोग्य आणि विविध नेत्रविकारांविषयी माहिती देणारे त्यांचे स्वलिखित 'नेत्रकोष' हे पुस्तक त्यांना भेट दिले. डॉ. दुधभाते नेत्रालयाच्या वतीने गेल्या पाच वर्षांपासून 'फिरता नेत्र दवाखाना' उपक्रम राबविण्यात येत आहे. या माध्यमातून आतापर्यंत एक हजारांहून अधिक मोफत नेत्रतपासणी शिबिरे घेण्यात आली असून, ग्रामीण भागातील दहा हजारांहून अधिक शालेय विद्यार्थ्यांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत नेत्रआरोग्य सेवा पोहोचविणाऱ्या या उपक्रमाबद्दल कोल्हे दाम्पत्याने समाधान व्यक्त केले. "वाढती लोकसंख्या आणि प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर नेत्ररुग्णांना तपासणीपासून उपचारांपर्यंतच्या आधुनिक सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होणे आवश्यक आहे. डॉ. दुधभाते नेत्रालयात अशा स्वरूपाच्या सर्वसमावेशक सुविधा उपलब्ध आहेत," असे डॉ. रवींद्र कोल्हे यांनी सांगितले. डॉ. स्मिता कोल्हे यांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबत रुग्णकेंद्रित दृष्टिकोनही तितकाच महत्त्वाचा असल्याचे नमूद केले. डॉ. अनिल दुधभाते यांच्या वैद्यकीय व सामाजिक कार्याबरोबरच नेत्रालयाच्या व्यवस्थापनाचेही त्यांनी कौतुक केले. डॉक्टर आणि कर्मचारी रुग्णांशी आपुलकीने व संवेदनशीलतेने संवाद साधत असल्याचे त्यांनी नमूद केले. "आरोग्यसेवा आणि सामाजिक कार्याला आयुष्य समर्पित केलेल्या कोल्हे दाम्पत्याची भेट आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या शब्दांमुळे ग्रामीण व गरजू घटकांपर्यंत नेत्रसेवा अधिक व्यापकपणे पोहोचविण्याची प्रेरणा मिळाली," असे डॉ. अनिल दुधभाते यांनी सांगितले. यावेळी साहित्यिक गिरीश वसेकर, नितीन पाटील, राजेंद्र शेळके, शीतल हिराळकर आणि अंकुर दुबे उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सोन्याचे दागिने शोधून देणाऱ्या प्रामाणिक मनपा कर्मचाऱ्यांचा सत्कार!

- कदम कुटुंबीयांना मिळाला दिलासा, अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे कौतुक

**पुणे (आरंभ पर्व) :** गणेश विसर्जनादरम्यान हरवलेले सुमारे पाच तोळ्यांचे सोन्याचे दागिने अथक प्रयत्नांनी शोधून कदम कुटुंबीयांना परत मिळवून देणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समिती अध्यक्ष सचिन मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विठ्ठलवाडी विसर्जन घाटावर घडलेल्या या घटनेत कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सौ. वृषाली मिलिंद कदम व श्री. मिलिंद कदम यांच्या गणपती मूर्तीला घातलेला सोन्याचा नेकलेस आणि अंगठी नजरचुकीने मूर्तीसोबत विसर्जित झाली. रात्री ही बाब लक्षात आल्यानंतर कदम कुटुंबीयांनी तातडीने विसर्जन घाटावर धाव घेत मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती दिली. महापालिका सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार यांनी तत्काळ दखल घेत दागिन्यांचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ आरोग्य निरीक्षक मंगलदास माने, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक आशिष सुपणार, कनिष्ठ अभियंता प्रदीप नाणेकर, आरोग्य निरीक्षक शिवाजीराव नलवडे, मोकादम प्रभाकर तुपेरे तसेच कर्मचारी मल्लेश राम मोरे, विक्रम मारुती अवधूते आणि विशाल अशोक वाघमारे यांनी शोधकार्यात सहभाग घेतला. पथकाने अथक प्रयत्न करून मौल्यवान दागिने शोधून काढले आणि कदम कुटुंबीयांकडे सुरक्षितपणे सुपूर्द केले. या प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ कार्याची दखल घेत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयतर्फे सत्कार करण्यात आला. प्रभाग समिती अध्यक्ष सचिन मोरे यांच्या हस्ते संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. नागरिकांच्या सेवेसोबतच प्रामाणिकपणा आणि माणुसकी जपणाऱ्या मनपा कर्मचाऱ्यांचे हे कार्य महापालिकेसाठी अभिमानास्पद असल्याची भावना सचिन मोरे यांनी व्यक्त केली.

### गणेशमूर्ती विसर्जनासाठी खताची भेट; पर्यावरणपूरक उपक्रम!



- 'आपला गणपती–स्वच्छ गणपती' अभियानाला सोसायट्यांचा हातभार; महापालिकेकडे खत सुपूर्द

**धायरी (आरंभ पर्व) :** गणेशोत्सवात भक्तीबरोबरच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सोसायटी फेडरेशन आंबेगाव बुद्रुक मध्य व नऱ्हे भूमकर नगरच्या वतीने अनोखा उपक्रम राबविण्यात आला. पुणे महानगरपालिकेच्या 'आपला गणपती–स्वच्छ गणपती' अभियानांतर्गत सोसायट्यांनी स्वतः तयार केलेले खत महापालिका प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आले. २३ सप्टेंबर रोजी गायमुख आरोग्य कोठी येथे झालेल्या कार्यक्रमात एक किलोच्या पॅकमधील खत महापालिका अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत देण्यात आले. शाडूच्या मातीची गणेशमूर्ती विसर्जनासाठी सुपूर्द करणाऱ्या नागरिकांना फेडरेशनतर्फे खताची पिशवी भेट दिली जाणार आहे. या पर्यावरणपूरक उपक्रमाचे महापालिका अधिकाऱ्यांनी कौतुक करून इतर भागांसाठीही हा आदर्श असल्याचे मत व्यक्त केले. फेडरेशनने यापूर्वी मे महिन्यात राबविलेल्या ई-वेस्ट ड्राइव्हमध्ये १२ हून अधिक सोसायट्यांच्या सहभागातून एक टन ई-कचरा संकलित केला होता. यावेळी वरिष्ठ आरोग्य निरीक्षक संतोष भाईक, आरोग्य निरीक्षक उमेश ठोंबरे, प्रभाग ३८ च्या ब्रँड ॲम्बेसेडर निर्मला थोरमाटे उपस्थित होते. फेडरेशनचे अध्यक्ष संदिप शैलेंद्र जाजुरे, सचिव सतवान कळेल, अनिकेत पाटील, राजेश भोलाने, मंगेश वीर, महेश घारे देशमुख, अमित पिलावरे व सदस्यांनी उपक्रमासाठी पुढाकार घेतला. पर्यावरण रक्षणासाठी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन फेडरेशनने केले.

# बनावट रहिवासी कागदपत्रे : विद्यार्थ्यांना आरटीई २५ टक्के प्रवेश

## पालकांवर गुन्हा दाखल

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

शैक्षणीक वर्ष २०२६-२७ मध्ये बनावट रहिवासी कागदपत्रांचा वापर करत पाल्याच्या आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊन लाभ घेतल्याप्रकरणी खेड पोलिस ठाण्यात १४ पालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित पालकांनी प्रत्यक्षात वास्तव्य नसलेल्या पत्त्याचे पुरावे सादर करून आरटीईअंतर्गत प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पंचायत समिती खेडचे गटशिक्षणाधिकारी अमोल विजय जंगले (वय ३६, रा. बोरघर, ता. आंबेगाव) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. खेड पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मार्च ते मे २०२६ या कालावधीत आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी तालुकास्तरीय समिती, पंचायत समिती खेड येथे पालकांनी अर्ज केले होते. अर्जासोबत सादर करण्यात आलेल्या रहिवासी पुराव्यांची तपासणी केल्यानंतर संबंधित कागदपत्रांबाबत संशय निर्माण झाला. आळंदी येथील डॉ. विश्वनाथ कराड वर्ल्ड पीस स्कूलमध्ये प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या पालकांमध्ये गणेश अरुण साळुंखे, सतीश दत्तात्रय गुंड, उत्तरेश्वर आश्रुबा गोचडे, योगेश बबन सातपुते, समीर रामचंद्र गोरे, राहुल भगवान चौधरी, वैभव होणाजी मोहिते, अजय मच्छिंद्रनाथ विरकर, संदीप दादा शिंदे आणि रमाकांत आनंदराव चव्हाण यांचा समावेश आहे. हे सर्व पालक केळगाव, हनुमानवाडी व आळंदी परिसरातील रहिवासी असल्याचे अर्जात नमूद करण्यात आले आहे. तर चाकण जवळील आंबेठाण येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रवेशासाठी दयानंद फकीरप्पा कुंभार, संदीप भिमराव कांदेकर पाटील, निलेश देवराव शेकार आणि अंगद दिलीप राऊत यांनी अर्ज केला होता. हे पालक चाकण व आंबेठाण परिसरातील रहिवासी असल्याचे अर्जात नमूद केलेले आहे.

या सर्व १४ पालकांनी पाल्याच्या आरटीई प्रवेशासाठी खोटी रहिवासी कागदपत्रे सादर केली आणि संबंधित पत्त्यावर प्रत्यक्ष वास्तव्य नसतानाही प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या माध्यमातून शासनाची दिशाभूल व फसवणूक केल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी पुढील तपास खेड पोलिसांकडून केला जात आहे.

# ओप्पोने भारतात के१४ प्लस सादर केला




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ओप्पो इंडियाने आज ओप्पो के१४ प्लसच्या सादरीकरणाची घोषणा केली. हा के मालिकेतील एक शक्तिशाली नवीन स्मार्टफोन असून, त्यामध्ये कार्यक्षमता, मनमोहक मनोरंजन, प्रगत छायाचित्रण आणि दीर्घकाळ टिकणारी क्षमता यांचा संगम करण्यात आला आहे. मीडियाटेक डायमेन्सिटी ७३६० मॅक्सद्वारे संचालित या स्मार्टफोनमध्ये १.५के १४४ हर्ट्झ अमोलेड अल्ट्रा ब्राइट डिस्प्ले, ६ वर्षे टिकणारी ८००० एमएएच मोठी बॅटरी, ४के व्हिडिओसह ५० मेगापिक्सेल ओआयएस मुख्य कॅमेरा आणि सातत्यपूर्ण कार्यक्षमतेसाठी ५००० चौ. मिमी वाफ कक्ष देण्यात आला आहे. ओप्पोच्या "कार्यक्षमतेसाठी सज्ज, दीर्घकाळ टिकण्यासाठी बनवलेला" या संकल्पनेभोवती विकसित केलेला के१४ प्लस, दैनंदिन वापरातील आव्हानात्मक गरजांशी जुळवून घेत सुरळीत आणि विश्वासार्ह अनुभव देण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

# पुण्यातील रमेश थोरात यांना पुरस्कार प्रदान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सांस्कृतिक मंत्रालय, नवी दिल्ली येथे ६५ व्या राष्ट्रीय कला प्रदर्शनात ललित कला अकादमी पुरस्कार पुण्यातील सुप्रसिद्ध चित्रकार रमेश विठ्ठल थोरात यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार भारतातील समकालीन दृश्यकलेतील सर्वात प्रतिष्ठित समजला जाणारा पुरस्कार आहे. ६५ व्या राष्ट्रीय कला प्रदर्शनासाठी देशभरातून २४९५ कलाकारांकडून ६हजार १७५ कलाकृती प्राप्त झाल्या व त्यातील २७० कलाकृतींची निवड प्रदर्शनासाठी करण्यात आली. त्यातून २० कलाकृती पारितोषिकासाठी निवडल्या गेल्या. प्रत्येकी ₹ २,००,०००/- रोख, मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि अंगवस्त्र असे या पारितोषिकाचे स्वरूप आहे. सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत हे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रमेश थोरात यांना यापूर्वीही अनेक पुरस्कार मिळाले असून त्यांची चित्रप्रदर्शने भारतात व परदेशातही झाली आहेत आणि त्यांची चित्रे संग्रहितही करण्यात आली आहेत.

त्यांच्या चित्रांबद्दल सांगायचे झाले तर त्यांची चित्रनिर्मिती म्हणजे वर्षानुवर्षांच्या तपस्येची प्रक्रिया आहे. चित्रणात प्रकर्षाने जाणवतो तो माती व सूर्यकिरणांचा पोत, भक्तिभावाची चिन्हे, गूढ विचार व आध्यात्मिक पुनरावृत्ती. या प्रक्रियेत विचार व रंगांचे थरावर थर संयमाने देऊन आध्यात्मिक परिणाम साधला जातो.

# संकटकाळात आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल लाईफ इन्शुअरन्सकडून मदतीचा हात

## कंपनीकडून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये प्रति वैयक्तिक दाव्यापोटी सरासरी १५ लाखांपर्यंत विमा मंजूर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल लाईफ इन्शुअरन्सने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये वैयक्तित मृत्यू दाव्यांपोटी मृत व्यक्तींच्या कुटुंबांना सरासरी १५ लाखांचे वाटप केले आहे. कंपनीने या दाव्यांच्या भरपाई रकमेच्या बाबतीत सलग दुस-या वर्षी या व्यवसायातील आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे. संकटकाळात कुटुंबीयांना आर्थिक स्थैर्य देण्याच्या ध्येयाप्रती कंपनी यानिमित्ताने आपली कटिबद्धता दर्शवते. विमा उद्योगातील गेल्या सहा वर्षांतील सार्वजनिक आकडेवारीनुसार, आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल इन्शुअरन्सचे सरासरी वैयक्तित मृत्यू दावा भरपाई मूल्य आता वाढले आहे. आर्थिक वर्ष २०२१ साली हे मूल्य १० लाखांवर नोंदवले गेले होते. हे मूल्य आता २०२६ साली १५ लाखांवर पोहोचले आहे. गेल्या ४-५ वर्षांत हे सरासरी दावा मूल्य १४ ते १५ लाखांच्या आसपास स्थिर झाल्याचे दिसून येते. वर्षागणिक लोकांचे उत्पन्न, कर्जे आणि कौटुंबिक जबाबदा-यांमध्ये बदल होतात, त्यामुळे आपल्या वाढत्या गरजा आणि जबाबदा-यांनुसार पॉलिसीधारकांनी आपल्या विमा संरक्षणाचा वेळोवेळी आढावा घेण्याची गरजही आता प्रकर्षाने जाणवू लागली आहे. याबाबतीत आयसीआयसीआय प्रुडेन्शिअल लाईफ इन्शुअरन्सचे अंडरटायटिंग एण्ड रिटेल क्लेम्स प्रमुख श्री. सारंग गोखले यांनी माहिती दिली. ते म्हणाले, "जीवन विमा हा कठीण काळात आर्थिक सुरक्षितता देण्याच्या एका आश्वानावर आधारित आहे. आम्ही आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ५ हजार १४९ कोटींचे दावे मंजूर केले आहेत. याशिवाय, कंपनीचा दावा निपटारा दर ९९.३ टक्क्यांवर नोंदवला गेला आहे. सर्व आवश्यक कागदपत्रे नोंदवल्यानंतर बिगर-तपासणी दाव्यांसाठी सरासरी केवळ १.१ दिवसांचा वेळ पुरेसा असतो. हे यश आम्ही ग्राहकांना आणि त्यांच्या कुटुंबांना दिलेल्या शब्दाला बांधील असल्याचे सिद्ध करते. विशेष म्हणजे, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफने गेल्या काही वर्षांत दावा भरपाईचे प्रमाण चांगले राखले आहे. ग्राहकांचे दावे वेळेवर पूर्ण करण्याच्या आपल्या वचनाचे पालनही केले आहे. पॉलिसीधारकांना याबाबतची माहिती किंवा मदत हवी असल्यास www.iciciprulife.com या कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देता येईल. कंपनीच्या ग्राहक सेवा क्रमांकावर संपर्क करता येईल.

> आम्ही सातत्याने दाव्यांची प्रक्रिया सोपी करत आहोत. तंत्रज्ञानावर आधारित सेवा पुरवत आहोत. यामुळे बाधित कुटुंबांना विनाविलंब मदत मिळते. यासोबतच, ग्राहकांनी त्यांच्या बदलत्या जीवनशैलीनुसार आणि ध्येयांनुसार आपल्या विमा संरक्षणाचा वेळोवेळी आढावा घ्यावा, यासाठीही आम्ही त्यांना प्रोत्साहित करत असतो."

# एशियन पेंट्सचे हैड्रोना आणि अल्ट्रा लाँच

- २५० वितरकांच्या सहभागातून साकारली ३८४ चौ. फुटांची भव्य लाकडी मोझॅक कलाकृती



**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

एशियन पेंट्स वुड ॲडेसिव्हजने लाकूडकाम क्षेत्रासाठी एशियन पेंट्स हैड्रोना आणि एशियन पेंट्स अल्ट्रा ही दोन नवीन उत्पादने बाजारात आणली आहेत. टिकाऊपणा, वापरण्यास सुलभता आणि मजबूत पकड यांचा विचार करून ही उत्पादने विकसित करण्यात आली आहेत.

या उत्पादनांच्या लाँचिंगनिमित्त देशभरातील २५० व्यावसायिक वितरक एकत्र आले आणि त्यांच्या सहभागातून ३८४ चौ. फुटांची भव्य लाकडी मोझॅक कलाकृती साकारण्यात आली. या कलाकृतीची 'एका संस्थेद्वारे निर्माण करण्यात आलेली सर्वात मोठी लाकडी मोझॅक कलाकृती' म्हणून आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे.

'एका चांगल्या बाँडची सुरुवात इथून होते' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून नवीन उत्पादनांच्या वैशिष्ट्यांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. प्रत्येक वितरकाने हैड्रोना ॲडेसिव्हचा वापर करून स्वतंत्र लाकडी पॅनेल तयार केले. त्यानंतर हे सर्व पॅनेल एकत्र जोडून भव्य मोझॅक कलाकृती साकारण्यात आली. त्यामुळे उत्पादन लाँचिंगसोबतच वितरक भागीदारांचा सहभागही या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग ठरला.

एशियन पेंट्सने या माध्यमातून घर आणि सजावट क्षेत्रातील आपले कौशल्य लाकूडकामासाठी आवश्यक असलेल्या ॲडेसिव्हच्या क्षेत्रापर्यंत विस्तारले आहे. टिकाऊ फर्निचर निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या मजबूत आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या जोडणीच्या गरजेवर कंपनीने भर दिला आहे.

एशियन पेंट्स हैड्रोना हे प्रीमियम जलरोधक लाकडी ॲडेसिव्ह असून, त्यात प्रगत जलरोधक पॉलिमर तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. लाकूडकामातील आव्हानात्मक कामांसाठी मजबूत आणि टिकाऊ पकड मिळावी, यासाठी हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे. उत्तम पसरण्याची क्षमता, वापरण्यास सुलभता आणि उच्च बाँड स्ट्रेंथ यांसोबत हैड्रोना १० टक्के अधिक कव्हरेज देत असल्याचा कंपनीचा दावा आहे. पाणी आणि दमटपणापासून फर्निचरचे संरक्षण करून त्याचे आयुष्य वाढविण्यास हे उत्पादन मदत करते.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. ०१ ऑक्टोबर २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा भाजपकडून गौरव!

- शिवणे-धायरी मंडलाच्या वतीने 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' सन्मान सोहळा; मनीषाताई मोरे यांचे आयोजन

धायरी (आरंभ पर्व) : बालकांच्या संगोपनापासून ते महिलांच्या आरोग्य आणि पोषणापर्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा शिवणे-धायरी मंडल भाजपच्या वतीने गौरव करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २५ वर्षांच्या सेवा व समर्पणाच्या निमित्ताने आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' हा सन्मान सोहळा पार पडला. अंगणवाडी सेविका या ग्रामीण आणि शहरी भागातील बालकांच्या विकासाचा महत्त्वाचा दुवा आहेत. त्यांच्या सेवाभावी कार्याची दखल घेत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून त्यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या वेळी नगरसेवक सुभाष भाऊ नाणेकर, मंडल अध्यक्ष विजय भाऊ मते, महिला मोर्चा मंडल अध्यक्ष मनीषाताई मोरे, उपजिल्हाध्यक्ष अनिल भाऊ मते, सचिन भाऊ कांबळे, सुभाष शिंदे सरकार, भगवान मामा मोरे, गणेश भाऊ गावंडे, राधाताई कनोजिया, निलिमाताई गावंडे, गौतमी ताई कांबळे, वैशाली ताई रणधीर, योजना ताई जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन महिला मोर्चा मंडल अध्यक्ष मनीषाताई मोरे यांनी केले होते. अंगणवाडी सेविकांच्या कार्याचे कौतुक करताना उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांशी जोडले जाऊन सामाजिक उपक्रमांना चालना मिळत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. अंगणवाडी सेविकांच्या सन्मानाच्या निमित्ताने त्यांच्या सेवाभावाला प्रोत्साहन देण्याचा आणि समाजातील त्यांच्या योगदानाला मान्यता देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

### बंधन फ्लेक्सी कॅप फंड २१ वर्षांचा

25 YEARS Bandhan AMC

पुणे (आरंभ पर्व) : बंधन फ्लेक्सी कॅप फंडाला २१ वर्षे पूर्ण होत असताना, हा टप्पा केवळ आकड्यांपलीकडे जाऊन, फंडाच्या दृष्टिकोनाला आकार देणाऱ्या गुंतवणूक तत्त्वज्ञानावर चिंतन करण्याची संधी देतो. अशा युगात, जिथे बाजाराचे नेतृत्व झपाट्याने बदलते, गुंतवणुकीच्या पद्धती लोकप्रिय होतात आणि त्यांची लोकप्रियता कमी होते, आणि गुंतवणूकदारांना अनेकदा नवीनतम ट्रेंडच्या मागे धावण्याचा मोह होतो, तिथे फंडाचा मूळ आधार संतुलन, विविधीकरण आणि अनुकूलनक्षमतेमध्ये रुजलेला आहे. इक्विटी गुंतवणुकीतील सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक म्हणजे, बाजाराच्या विविध चक्रांमध्ये कोणतीही एकच गुंतवणूक पद्धत सातत्याने सर्वोत्तम कामगिरी करत नाही. वेगवेगळ्या वेळी, मोमेंटम स्टॉक्सनी सर्वाधिक परतावा दिला आहे, तर इतर काळात व्हॅल्यू, क्वालिटी, ग्रोथ किंवा कमी-अस्थिरतेच्या धोरणांनी आघाडी घेतली आहे. पुढील काही वर्षांत कोणती पद्धत प्रभावी ठरेल याचा अंदाज लावणे, बाजारातील अनुभवी गुंतवणूकदारांसाठीही कठीण असू शकते. हे वास्तव ओळखून, बंधन फ्लेक्सी कॅप फंड कोणत्याही एका घटकावर किंवा बाजाराच्या ट्रेंडवर केंद्रित गुंतवणूक करण्याऐवजी, जाणीवपूर्वक संतुलित गुंतवणूक दृष्टिकोन अवलंबतो.

### शिरूरमध्ये 95 हजारांची लाच घेताना हवालदार जाळ्यात

पुणे (आरंभ पर्व) : एका दाखल गुन्ह्यामध्ये अटक न करण्यासाठी तक्रारदाराकडून ९५ हजार रुपयांची लाच घेताना शिरूर पोलिस ठाण्यातील हवालदार सतीश नाथाराव मुंढे (वय ४५) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) जाळ्यात अडकला. मात्र, लाच स्वीकारल्यानंतर 'एसीबी'च्या पथकाची चाहूल लागताच हवालदार मुंढे लाचेच्या रकमेसह घटनास्थळावरून पसार झाला. या संदर्भात ५९ वर्षीय तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पुणे येथील कार्यालयात तक्रार दिली होती. त्यानुसार हवालदार सतीश मुंढे या संशयिताविरुद्ध शिरूर पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 'एसीबी'च्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या विरोधात शिरूर पोलिस ठाण्यात एक गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिस हवालदार सतीश मुंढे यांच्याकडे होता. या गुन्ह्यामध्ये तक्रारदार आणि त्यांच्या कुटुंबीयांना अटक न करण्यासाठी मुंढे याने सुरुवातीला एक लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने ३० सप्टेंबर रोजी पुणे 'एसीबी'कडे तक्रार नोंदवली. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मंगळवारी (ता. ३०) लाचेच्या मागणीची पडताळणी केली. या कारवाईदरम्यान हवालदार मुंढे याने तक्रारदाराला शिरूर पोलिस ठाण्यांतर्गत टाकळी हाजी पोलिस चौकीत बोलावले. तिथे त्याने स्वतःसाठी आणि वरिष्ठांच्या नावाने सुरुवातीला एक लाख आणि नंतर तडजोडीअंती ९५ हजार रुपयांची मागणी केली.

# किस्टोन मध्ये 'रोजगार महाकुंभ २०२६' उत्साहात संपन्न

## २६ कंपन्यांचा सहभाग, ६०० हून अधिक उमेदवारांची नोंदणी




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना थेट उद्योगविश्वाशी जोडून त्यांच्या कौशल्याला रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने Keystone School of Engineering तर्फे आयोजित करण्यात आलेला 'रोजगार महाकुंभ २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध शैक्षणिक पात्रता आणि शाखांतील युवक-युवतींना एकाच व्यासपीठावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम ठरला.

या रोजगार महाकुंभाचे उद्घाटन डॉ. रावसाहेब लटपटे, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना बदलत्या उद्योगविश्वातील गरजा, कौशल्यविकास आणि रोजगाराच्या उपलब्ध संधी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या महाकुंभात विविध क्षेत्रांतील २६ नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला, तर कंपन्यांचे ७५ हून अधिक प्रतिनिधी उमेदवारांच्या निवड प्रक्रियेसाठी उपस्थित होते. रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी ६०० हून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली. विविध कंपन्यांच्या आवश्यकतेनुसार उमेदवारांच्या मुलाखती, कौशल्य चाचण्या आणि निवड प्रक्रिया दिवसभर घेण्यात आली. या माध्यमातून १०० हून अधिक रोजगाराच्या ऑफर्स मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

'रोजगार महाकुंभ २०२६'चे वैशिष्ट्य म्हणजे केवळ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांपुरता हा उपक्रम मर्यादित न ठेवता विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने पाच श्रेणींचा समावेश करण्यात आला होता.

ITI व Diploma, BBA व BCA, Core Engineering, IT Related Engineering आणि Post Graduate या पाचही श्रेणींतील उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व कौशल्यानुसार विविध कंपन्यांमध्ये संधी उपलब्ध झाल्या.

यामुळे पारंपरिक अभियांत्रिकी क्षेत्राबरोबरच IT, व्यवस्थापन, संगणक अनुप्रयोग, तांत्रिक तसेच इतर विविध क्षेत्रांमध्ये करिअरच्या संधी शोधणाऱ्या युवकांना एकाच ठिकाणी अनेक पर्याय उपलब्ध झाले. या भव्य रोजगार महाकुंभाच्या यशस्वी आयोजनामध्ये १०० हून अधिक विद्यार्थी स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. उमेदवारांची नोंदणी, मार्गदर्शन, कंपनीनुसार उमेदवारांचे नियोजन, मुलाखतींचे व्यवस्थापन, कंपनी प्रतिनिधींचे समन्वय आणि कार्यक्रमातील विविध व्यवस्थापनाची जबाबदारी विद्यार्थी स्वयंसेवकांनी प्रभावीपणे पार पाडली. तसेच ३० हून अधिक स्टाफ समन्वयकांनी संपूर्ण कार्यक्रमाच्या नियोजनात आणि अंमलबजावणीत महत्त्वाची भूमिका बजावली. मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या उमेदवारांचे व्यवस्थापन आणि विविध कंपन्यांच्या निवड प्रक्रियेचे सुरळीत आयोजन करण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले होते.

## वयोमान वाढले तरी स्वावलंबन सोडण्याची गरज नाही





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील ज्येष्ठ नागरिकांची संख्या वेगाने वाढत आहे. संयुक्त राष्ट्रसंघ लोकसंख्या निधी (यूएनएफपीए) आणि इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पॉप्युलेशन सायन्सेसच्या 'इंडिया एजिंग रिपोर्ट २०२३'नुसार, २०२२ मध्ये भारतात ६० वर्षांवरील नागरिकांची संख्या सुमारे १४.९ कोटी होती. ही संख्या २०५० पर्यंत ३४.७ कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. म्हणजेच २०५० मध्ये भारतातील प्रत्येक पाच व्यक्तींमागे एक व्यक्ती ज्येष्ठ नागरिक असेल. विशेषतः ८० वर्षांवरील नागरिकांची संख्या सर्वाधिक वेगाने वाढत आहे. यंदाच्या 'आंतरराष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिना'ची संयुक्त राष्ट्रसंघाने दिलेली संकल्पना 'दीर्घायुष्याचे युग : दीर्घ आयुष्यासाठी व्यवस्थांचा पुनर्विचार' अशी आहे. अधिक काळ जगणे महत्त्वाचे असले, तरी हे आयुष्य निरोगी, सक्रिय आणि स्वावलंबी कसे राहील, हा त्याहून महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या स्वावलंबनात हालचालींची क्षमता अत्यंत महत्त्वाची असते. 'लाँगिट्युडिनल एजिंग स्टडी इन इंडिया'च्या (एलएएसआय) विश्लेषणानुसार, ६० वर्षांवरील सुमारे आठपैकी एका व्यक्तीला मागील दोन वर्षांत पडण्याचा अनुभव आला आहे. अशक्तपणा असलेल्या ज्येष्ठांमध्ये हा धोका अधिक असतो. पडल्यामुळे फ्रॅक्चर, रुग्णालयात दाखल होण्याची वेळ आणि त्यानंतर हालचालींबाबत निर्माण होणारा आत्मविश्वासाचा अभाव यामुळे दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होऊ शकतो. "अनेकदा ज्येष्ठ व्यक्ती किंवा त्यांचे कुटुंबीय डॉक्टरांकडे पडून दुखापत किंवा फ्रॅक्चर झाल्यानंतरच येतात. मात्र चालताना होणारे गुडघे किंवा कंबरेचे दुखणे, खुर्चीतून उठताना त्रास होणे, वाकून चालणे किंवा दुखापत न होता पडण्याची घटना याकडेही गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

## संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीची आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ मध्ये त्रिशतकी भरारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीने इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्स (आयएपी) एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करत तीन प्रतिष्ठित पुरस्कार पटकावले. नवी दिल्ली येथील यशोभूमी कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित वर्ल्ड फिजिओथेरपी एशिया वेस्टर्न पॅसिफिक प्रादेशिक परिषदेदरम्यान झालेल्या विशेष समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. आयएपीचे अध्यक्ष डॉ. संजीव झा यांच्या हस्ते संचेती हेल्थकेअर अकॅडमीच्या अध्यक्ष मनीषा संघवी आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. राधा भट्टड यांनी हे पुरस्कार स्वीकारले. संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीला 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच संस्थेचे प्रमुख रुग्णालय असलेल्या संचेती इन्स्टिट्यूट फॉर ऑर्थोपेडिक्स अँड रिहॅबिलिटेशन (एसआयओआर) यांना 'टेक्नोलॉजी इंटीग्रेटेड सेंटर अवॉर्ड' आणि 'स्पेशलाइज्ड ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन सेंटर अवॉर्ड' या दोन पुरस्कारांनी गौरविण्यात आले. सुमारे ७० वर्षांची परंपरा असलेल्या राष्ट्रीय स्तरावरील इंडियन असोसिएशन ऑफ फिजिओथेरपिस्ट्सतर्फे



### तीन प्रतिष्ठित पुरस्कार

दिले जाणारे आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्स फिजिओथेरपी शिक्षणातील शैक्षणिक गुणवत्ता, वैद्यकीय क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रम आणि संशोधनातील योगदानाची दखल घेतात. पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण आणि डॉ. बी. सी. रॉय पुरस्काराचे मानकरी डॉ. के. एच. संचेती यांच्या दूरदृष्टीतून १९९५ मध्ये संचेती कॉलेज ऑफ फिजिओथेरपीची स्थापना झाली. नॅक मान्यताप्राप्त या संस्थेत फिजिओथेरपी पदवी, पदव्युत्तर तसेच पीएच.डी. अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता प्रत्यक्ष रुग्णसेवेचा अनुभव देण्यावर विशेष भर दिला जातो. प्रमुख तृतीयस्तरीय रुग्णालयासह विविध रुग्णालयांमध्ये विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विभागांत प्रशिक्षण दिले जाते. आधुनिक पुनर्वसन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रात्यक्षिक प्रशिक्षण, संशोधनासाठी प्रोत्साहन, राष्ट्रीय स्तरावरील परिषदांमध्ये सहभाग आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. या यशाबद्दल बोलताना संचेती हेल्थकेअर अकॅडमीच्या अध्यक्ष मनीषा संघवी म्हणाल्या, "आयएपी एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६ हे आमच्या गेल्या ३० वर्षांपासून सुरू असलेल्या शैक्षणिक दृष्टिकोनाला मिळालेली महत्त्वपूर्ण मान्यता आहे. सखोल वैद्यकीय प्रशिक्षण, उपचारांच्या परिणामांवर आधारित संशोधन आणि आधुनिक पुनर्वसनशास्त्राचा शिक्षणात सुरुवातीपासूनच समावेश या आधारांवर आमची शिक्षणपद्धती विकसित झाली आहे." त्या पुढे म्हणाल्या, "सर्वोत्कृष्ट महाविद्यालय हा पुरस्कार आमच्या संस्थेच्या जडणघडणीत आणि विकासात योगदान देणाऱ्या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांची दखल घेणारा आहे. संस्थापक डॉ. के. एच. संचेती यांची दूरदृष्टी तसेच संस्थेच्या प्रवासाचा भाग राहिलेल्या प्रत्येक प्राचार्य, प्राध्यापक, वैद्यकीय तज्ज्ञ, विद्यार्थी, माजी विद्यार्थी आणि टीम सदस्यांच्या योगदानाचा हा सन्मान आहे."

"हा गौरव फिजिओथेरपी शिक्षण, संशोधन आणि वैद्यकीय क्षेत्रातील उत्कृष्टतेचे मानदंड अधिक बळकट करण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. आरोग्यसेवा व्यवस्थापन व नर्सिंग, एक्सप्रेसिव्ह आर्ट्स आणि मुव्हमेंट थेरपी तसेच क्लिनिकल फेलोशिप्स या क्षेत्रांत विद्यार्थी आणि युवा व्यावसायिकांसाठी नव्या संधी निर्माण करण्याची परंपरा पुढे नेण्यासाठीही हा पुरस्कार प्रोत्साहन देईल.

# बांधकाम क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभावी अंमलबजावणी आवश्यक

## श्रावण हर्डीकर यांचे प्रतिपादन; केंद्रीय अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयाअंतर्गत एकदिवसीय 'ग्रिहा रिजनल कॉन्क्लेव्ह'चे उद्‌घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर बांधकाम क्षेत्रातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पर्यावरणीय नियमांची प्रभावी अंमलबजावणी, नियमित देखरेख आणि शाश्वत बांधकाम पद्धतींचा अवलंब आवश्यक आहे," असे प्रतिपादन महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रवण हर्डीकर यांनी केले. शाश्वत पर्यावरणपूरक बांधकामांना प्राधान्य ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.




केंद्रीय अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयाच्या ग्रीन रेटिंग फॉर इंटिग्रेटेड हॅबिटॅट असेसमेंट (ग्रिहा), दी एनर्जी अँड रिसोर्स इन्स्टिट्यूट (टेरी) व नॉलेज पार्टनर सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्ह (एसआय) या संस्थांच्या वतीने आयोजित 'ग्रिहा रिजनल कॉन्क्लेव्ह'च्या उद्‌घाटनप्रसंगी हर्डीकर बोलत होते. 'कमी कार्बन उत्सर्जनाचा भविष्यकालीन मार्ग: बांधकामांपासून पायाभूत सुविधांपर्यंत' अशी या परिषदेची संकल्पना होती. कोरेगाव पार्क येथील हॉटेल कॉनरॅडमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे (आयसर) संचालक डॉ. सुनील भागवत, पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रसाद मोडक, 'ग्रिहा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शेठ, 'टेरी'च्या शाश्वत बांधकाम विभागाच्या संचालिका शबनम बस्सी, व्ही. के. ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक हृषीकेश कुलकर्णी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे माजी मुख्य अभियंता विवेक खरवडकर, बांधकाम व्यावसायिक सर्वेश जावडेकर, आर्कि. अनुजा पंडित, सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हच्या विश्वस्त अनघा परांजपे-पुरोहित, विजय साने, उपेंद्र देशपांडे, डी. वाय. पाटील महाविद्यालयातील प्रा. दिनेश झोपे, विश्वकर्मा विद्यापीठातील स्कुल ऑफ आर्किटेक्चर अँड प्लॅनिंगच्या अधिष्ठाता डॉ. प्रीती धनवट आदी उपस्थित होते.

यावेळी 'ग्रिहा'ने विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे व डी. वाय पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई यांच्याशी सामंजस्य करार केला. श्रवण हर्डीकर म्हणाले, "शाश्वत विकास हवा असेल, तर प्रत्येकाने पुढाकार घेऊन काम करण्याची आवश्यकता आहे. पर्यावरणपूरक बांधकाम न करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हायला हवी. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरू असल्याने धुळीचे प्रमाण वाढलेले दिसते, त्यावर नियंत्रण येण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे."

डॉ. सुनील भागवत म्हणाले, "शाश्वततेच्या दृष्टीने येत्या काळात भारत जगाचे नेतृत्व करू शकतो. शाश्वतता महत्वाची आहेच; पण अर्थशास्त्र आणि मानवी गरजा हे त्यापेक्षाही जास्त महत्वाचे आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक व शाश्वत विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात संशोधन व नाविन्यपूर्ण उपक्रम करण्याची गरज आहे."

संजय शेठ म्हणाले, "झपाट्याने विकसित होत असलेल्या पुणे शहरात पायाभूत सुविधाही गरजेच्या आहेत. मात्र या सुविधा उभारताना पर्यावरणाची हानी होणार नाही, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. शाश्वत व पर्यावरणपूरक बांधकामांसाठी सर्व घटकांनी पुढाकार घेऊन एकत्रितपणे काम करावे. त्यासाठी ही परिषद नक्कीच मार्गदर्शक ठरेल." प्रारंभी डॉ. प्रसाद मोडक व अनघा परांजपे-पुरोहित यांनी शाश्वत विकासासाठी पर्यावरणीय मंजुरी व कार्बन उत्सर्जन कमी करण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी 'ग्रिहा रेटिंग' मिळालेल्या प्रकल्प आणि शाळांना विशेष सन्मानित करण्यात आले. या निमित्ताने 'ग्रिहा'च्या शिष्टमंडळाने पुण्यातील 'सारथी' या हरित इमारतीला भेट देत पाहणी केली.

'शाश्वततेचा विस्तार: हरित इमारतींपासून ते अनुकूल शहरे आणि पायाभूत सुविधांपर्यंत' आणि 'कमी-कार्बन संक्रमणासाठी वित्तपुरवठा: व्यावसायिक रणनीतीपासून ते कार्बन मूल्यापर्यंत' या विषयावरील चर्चासत्रात तज्ज्ञांनी विचार मांडले. अदिती देव यांनी सूत्रसंचालन केले. शबनम बस्सी यांनी आभार मानले.









दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.